# कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्यातील योगदान एक अभ्यास

प्रा.कांबळे डी.एस
भूगोल विभाग,
जवाहर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदुर
ता. तुळजापूर जि.धाराशीव

**गोषवरा:**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम असून समाज जीवनाच्या गरजा आशा - आकांक्षा व उद्दिष्टे यांच्याशी शिक्षणाचा जवळचा संबंध आहे. समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक विचार प्रवाहास योग्य वळण देण्याचे काम शिक्षणाचे आहे. मनुष्याची अस्मिता आणि अस्तित्व शाबूत ठेवून त्याला स्वावलंबानाने, स्वाभिमानाने आणि सुखाने जगण्याचा मार्ग दाखविणे हे शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे त्यामुळे समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी समाजातील सर्व घटकांना शिक्षण मिळाले पाहिजे होते. परंतु भारतीय समाजात शिक्षण घेण्याचा अधिकार मुठभर लोकांनाच होता. त्यामुळे बहुजन समाज हा शिक्षणापासून वंचित होता.

**मुख्य शब्द:** अभ्यास, शैक्षणिक कार्य

**परिचय:**

भाऊराव पायगौंडा पाटील यांना सामान्यता कर्मवीर भाऊराव पाटील असे संबोधिले जाते. कर्मवीर म्हणजे सतत कार्यरत असणारे व्यक्तिमत्व भाऊराव पाटील यांना महाराष्ट्रातील बहुजन समाजाने 'कर्मवीर' ही पदवी प्रदान केली. भाऊरावांनी आयुष्यभर अव्याहत त्याग आणि कष्ट करून या समाजाची जी महान सेवा केली तिच्या संबंधीची उत्स्फूर्त कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांचा 'कर्मवीर' असा सार्थ गौरव करण्यात येऊ लागला. कर्मवीर भाऊराव पाटील हे संपूर्ण महाराष्ट्राचे एक अत्यंत आदरणीय व्यक्तिमत्व आहे. स्त्रियांच्या शिक्षणाचा त्यांनी हिरीरीने पुरस्कार केला. भाऊरावांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य अधिक महत्त्वाचे होते. आज त्यांचे हे कार्य एखाद्या विराट वृक्षाच्या फांद्याप्रमाणे पसरले आहे. प्राथमिक स्तरापासून ते उच्च शिक्षणापर्यंत संपूर्ण शिक्षण मोफत देता येणे शक्य आहे. हे भाऊरावांनी सिद्ध करून दाखविले त्यांचे अथक परिश्रम, संघटन कौशल्य आणि सर्वसामान्य जनतेसंबंधीचा कळवळा यातून दिसून येतो. सातारा जिल्ह्यात अनेक चांगल्या शिक्षण संस्था उभा राहिल्या आहेत या शाळा मुख्यतः ग्रामीण भागात आहेत. विद्यार्थ्यांमध्ये चारित्र्य आणि कष्टाळू वृत्ती रुजावी यावर तेथे भर देण्यात येतो. या शाळांमध्ये साधी राहणी आणि स्वावलंबन याचा पुरस्कार करण्यात येत असल्यामुळे गरीब कुटुंबातील मुलांची चांगली सोय झाली हा या शाळांचा लक्षणीय विशेष होय. भाऊरावांचे स्वतःचे आचरण आणि विद्यार्थ्यासंबंधी आस्था पाहून आपण त्यांच्या कार्यात सहभागी व्हावे अशी विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते.

**बालपण:**

आण्णाचा जन्म २२ सप्टेंबर१८८७ मध्ये कुंभोज येथे झाला त्यांचे आणि त्यांच्या इतर भावाचे बालपण तासगाव, दहिवडी, विटा आणि कुंभोज येथे व्यतीत झाले. समवयस्क मुलांचे पुढारीपण आण्णा करीत असत. भाऊराव वयाच्या १५ वर्षी राजाराम हायस्कूलमध्ये पहिल्यांदा प्रविष्ट झाले. त्यांना या वेशात पाहताच इतर मुले हसू लागली. आपल्या लंगोटीमुळे मुले आपल्याला हसली हे भाऊरावना कळून यायला काही दिवस जावे लागले. पुस्तकी शिक्षणाच्या बाबतीत फारशी प्रगती न करणारा हा विद्यार्थी शिक्षकांना दुसऱ्या एका कारणासाठी आवडायचा शारीरिक कष्टाचे कोणतेही काम करायची भाऊरावांची नेहमीच तयारी असायची आपल्या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांनी शारीरिक कष्टाची कामे करायला हवीत अशी त्यांची अपेक्षा असते. भाऊराव उत्कृष्ट कार्यकर्ते होते आणि त्यांच्याकडे पाहून वस्तीगृहातील इतर विद्यार्थ्यांनाही काम करण्याची प्रेरणा मिळते.

उद्दिष्टे:

1. विद्यार्थ्यांना वर्गात शिकण्याची आवड निर्माण करणे.
2. मागासवर्गीय गरीब मुलांना मोफत शिक्षण देणे.
3. विविध जाती धर्माच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रेम निर्माण करणे.
4. चुकीच्या भूमिकांना फाटा देऊन खऱ्या विकासाला वळण देणे.
5. सर्व मुलांना काटकसरी, संतुलित,स्वावलंबी आणि उत्साही बनविण्यावर भर देणे.

**कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य:**

भाऊराव पाटील शिक्षणाकडे प्रथम वळले ते उदरनिर्वाहाचे साधन म्हणून आणि हे कार्य त्यांनी चोखपणे पार पाडले ते शिकण्यासाठी घरातून बाहेर पडत. एकदा भाऊराव लवकर बाहेर पडलेले असताना त्यांनी एका चोराला कसे पकडले ही गोष्ट प्रसिद्ध आहे. त्यामुळे त्या भागात त्यांचा नावलौकिक तर वाढलाच, विशेषत: पोलिस त्यांना मानू लागले. पण त्यापेक्षाही भाऊरावांना मोठा फायदा झाला, तो म्हणजे त्यांना आणखी शिकवण्या मिळाल्या. या शिकवण्या करीत असतानाच भावरावांना शिक्षण हेच आपले अंगीकृत कार्य आहे याचा साक्षात्कार झाला. जे लोक आपल्याला पैसे देऊ शकत नाहीत अशांच्या मुलांनाही शिक्षण मिळायला हवे असे भाऊरावाना तीव्रतेने वाटू लागले ही उर्मी एवढी उत्कृष्ट होती की त्यामुळे त्यांनी १९१० मध्ये दुधगाव येथे शिक्षण प्रसारक संस्था स्थापन केली.

दुधगाव हे वाळवा तालुक्यातील इस्लामपूरपासून १० मैलावर आहे. तेथील ज्या मुलांचे प्राथमिक शिक्षण सुरू झालेले आहे अशांसाठी रात्रीच्या अभ्यासाची काहीतरी सोय करावी, असे भाऊरावाच्या मनात आले आणि त्यातूनच शिक्षण प्रसारक संस्थेचा जन्म झाला. शाळेजवळच्या एका इमारतीत कंदिलाची सोय करण्यात आली. आजूबाजूच्या भागातील मुलांनी रात्री येथे यावे, अभ्यास करावा आणि मग तेथेच झोपी जावे, अशी भाऊरावाची अपेक्षा होती. भाऊरावाच्या अभ्यासावर देखरेख ठेवण्यासाठी त्याना मार्गदर्शन करण्यासाठी कोणीही अनुभवी व्यक्ती न लाभल्यामुळे खूप मोठे नुकसान होते. ज्या मुलांचे आई-वडील शिकलेले नसतात त्यांना भाऊरावासारखीच अडचण जाणवते. आपला हा अनुभव ध्यानात असल्यामुळे भाऊरावानी दुधगाव मधील मुलासाठी मार्गदर्शनाची ही सोय केली.

भाऊरावांचे दुधगाव येथील हे अभ्यास केंद्र 'विद्यार्थी आश्रम' म्हणून ओळखली जाऊ लागले या 'विद्यार्थी आश्रमा' च्या कार्यामध्ये भाऊरावाना तिथे अनेक सहकारी लाभले. त्यात दादा जिनाप्पा मद्दाण्णांच्या या ग्राम शिक्षकांचा विशेष उल्लेख करायला हवा. आपण दुधगाव येथे शिक्षण प्रसारक संस्था स्थापन केली यामध्ये मद्दाण्णांचा सहभाग मोठा होता, हे भाऊराव मोकळ्या मनाने मान्य करतात. मद्दाण्णा प्रत्येक मुलांच्या अभ्यासावर देखरेख ठेवीत. ते स्वतः जैन होते, पण विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना हा जैन आहे की नाही असा भेदभाव त्यांनी कधीच केला नाही. जैनाप्रमाणे मराठा, महार, मुसलमान आणि मांग या विद्यार्थ्यांचाही ते अभ्यास घेत असत थोर हृदयाच्या या ग्रामशिक्षकाचा जीव सर्वच विद्यार्थ्यांसाठी तळमळत असे.

दुधगाव येथे भाऊरावांचे नातेवाईक राहत असत. त्यामुळे भाऊरावांचे तिथे अधून मधून जाणे होई. असेच एकदा ते दुधगावला गेलेले असताना, मद्दाण्णां मास्तर आपल्या विद्यार्थ्यांसाठी किती राबत आहेत हे त्यांनी पाहिले. त्यातूनच भाऊरावांना अभ्यास केंद्राची कल्पना सुचली. इतर गावकऱ्यांनीही भाऊरावाची ही कल्पना उचलून धरली. त्यात बाबासाहेब रावजी येडेकर, अण्णासाहेब पाटील आणि भाऊ दादा कुदळे हे प्रमुख होते. भाऊरावांनी आपल्या या अभ्यास केंद्रासाठी एक मोठा वाडा भाड्याने घेतला. बरेच दिवस तो रिकामा पडलेला असल्यामुळे उजाड दिसे. या वाड्यावर दरोडेखोरांची एकदा धाड पडली होती आणि त्यात कोल्हापूरचा रॉबिनहुड

सत्य होता तेव्हापासून तेथे कोणीही राहीना. ही एवढी मोठी जागा आपल्याला कमी किंमतीत मिळावी म्हणून या वाड्यात भुताटकी आहे. अशी काही मतलबी धनिक माणसांनी अफवा पसरवली. त्या श्रीमंताचा हा डाव कळून येताच भाऊरावांनी मद्वाण्णांच्या अभ्यासकेंद्रासाठी तो वाडा नाममात्र भाड्याने घेतला. महाराष्ट्रातील महत्त्वाच्या ठिकाणी शाळा सुरू करताना, आपल्या स्पर्धकांच्या आणि हितशत्रूंच्या कारवायांवर मात करण्याची अशीच धडाडी भाऊरावांनी पुढच्या आयुष्यात ही बऱ्याच वेळा दाखविली.

नेर्ले ता. वाळवे आणि काले ता. कराड या दोन खेडेगावांमध्ये आणि त्यानंतर सातारा येथे भाऊरावांने जी वस्तीगृह काढली त्याची मूळ दुधगाव येथील शिक्षण प्रसारक संस्थेच्या 'विद्यार्थी आश्रमा' मध्ये सापडते. सातारा येथील वस्तीगृहाचे छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस असे नाव ठेवण्यात आले. गरीब किंवा कनिष्ठ मध्यमवर्गीय कुटुंबामध्ये मुलांना जे काही उपलब्ध होते तेवढेच या वस्तीगृहामध्ये त्यांना मिळेल, त्यापेक्षा या वस्तीगृहामधील राहणीमानात वरचे असता कामाने भाऊरावानी कटाक्षाने पाहिले. उदाहरणात दुधगावच्या 'विद्यार्थ्या आश्रमा' मध्ये विद्यार्थ्यांना चिमण्यांच्या मंद प्रकाशात लिहावे - वाचावे लागे. भाऊरावांच्या अनेक वस्तीगृहात त्यावेळी अशा चिमण्या दिसत होत्या. छत्रपती शिवाजी कॉलेजच्या वस्तीगृहात सुरुवातीची काही वर्षे या चिमण्यांच्या प्रकाशातच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अभ्यास करावा लागला. दुधगाव येथल्या 'आश्रमा'तील दिव्यांची आणि झोपण्याची व्यवस्था अगदीच प्रतिची होती. परंतु तेथील बंधू भावाची वृत्ती कमालीची, पुरोगामी होती. मद्वाण्णांचा मास्तर, भाऊराव पाटील आणि त्यांचे इतर सहकारी सर्व जातीच्या विद्यार्थ्यांकडे सारखेच लक्ष पूर्वीत असत.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सन १९३५ च्या सुमारास खेडोपाडी प्राथमिक शाळा सुरू करण्याचे ठरविले. ज्याठिकाणी शाळा चालु करणे अतिशय अवघड होते, अशा डोंगर कपारीत खेड्यापाड्यामध्ये भाऊरावांनी स्वयंसेवी प्राथमिक शाळा स्थापन केल्या. प्राथमिक शिक्षण चांगल्या प्रतिचे व्हायचे असेल तर त्या शाळेत प्रशिक्षित शिक्षक असला पाहिजे. त्यातून त्यांनी खेडे तेथे शाळा आणि शाळा तेथे प्रशिक्षित शिक्षक हे सुत्र मनाशी धरून १९३५ मध्ये सातारा येथे अध्यापक विद्यालय स्थापन केले. प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाची सोय केली.

प्राथमिक शिक्षणानंतर विद्यार्थ्यांच्या माध्यमिक शिक्षणाची सोय व्हावी म्हणून आण्णांनी १९४० मध्ये बडोदयाचे राजे महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या नावे सातारा येथे माध्यमिक विद्यालयाची स्थापना केली. या माध्यमिक शाळेतील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी माध्यमिक शाळेत प्रशिक्षित पदवीधर शिक्षक असावेत व ते संस्थेच्या ध्येय धोरणानुसार काम करणारे असावेत या हेतूने कर्मवीरांनी १९५५ साली सातारा येथे 'आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन ची स्थापना केली. या महाविद्यालयात दर्जेदार शिक्षक तयार झाले.

माध्यमिक शिक्षण पूर्ण करणाऱ्या गोरगरिबांच्या मुलांच्या उच्चशिक्षणाची सोय व्हावी, तसेच कमवा व शिका हा स्वावलंबनाचा प्रयोग ही कर्मवीरांना उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर करावायाचा होता. त्यासाठी कर्मवीरांनी सन १९४७ मध्ये सातारा येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावे महाविद्यालयाची स्थापना केली. त्यानंतर कर्मवीरांनी विविधा प्रकारची शिक्षण देणारी अनेक महाविद्यालय वेगवेगळ्या ठिकाणी स्थापन केली.

अशाप्रकारे प्राथमिक, माध्यमिक उच्च व व्यावसायिक शिक्षण संस्थेच्या स्थापनेतून रयत शिक्षण संस्थाचा मोठा विकास झाला. आज आण्णानी स्थापन केलेली रयत शिक्षण संस्था ही अशिया खंडातील सर्वांत मोठी संस्था आहे. या संस्थेच्या महाराष्ट्रातील १४ जिल्हयात व कर्नाटक राज्यात मिळून ६७२ शाखा आहेत. त्यामध्ये १८ पुर्व प्राथमिक, २५ प्राथनिक, ४३९ माध्यमिक विद्यालय, ८ आश्रमशाळा, ८ अध्यापक विद्यालय, २ आय.टी.आय.

कॉलेज व ४० महाविद्यालयांचा त्यात समावेश आहे. या संस्थेत सुमारे १७ हजार सेवक काम करतात व ४ लाख ३४ हजार विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेतात. या संस्थेच्या माध्यमातून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय झाली. त्यातून शिक्षणाची गंगा खेडयापाडयापर्यंत पोहचली गेली. त्यातून समाज परिवर्तन होण्यास मदत झाली. अशा प्रकारे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपल्या शैक्षणिक कार्याद्वारे खेड्यापाड्यातून प्राथमिक, माध्यमिक शाळा सुरू केल्याने शिक्षण क्षेत्रातील मक्तेदारी संपुष्टात आली.

स्वतःच्या हिंमतीवर जबरदस्त विश्वास, श्रमावर श्रध्दा, अन्यायाची चीड, न्यायाची चाड आणि स्वावलंबी शिक्षणाविषयी नितांत प्रेम बाळगून सहयाद्रीच्या कुशीत लपलेल्या खेड्या-पाडयातील शिक्षणाची मुळे खोलवर रुजविण्याचे दूरदर्शी शिक्षणाचे कार्य करणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षणाविषयीचे विचार अत्यंत मौलिक आहेत. त्यांनी शाळा, विद्यार्थी व शिक्षक या संदर्भात विचार व्यक्त करून शिक्षण क्षेत्रातील वास्तवता स्पष्ट करण्याचा प्रयत्ला केलेला आहे. त्यातून शैक्षणिक विकासाला चालना मिळण्यास मदत झाली. स्वावलंबन, स्वाभिमान, स्वाध्याय व स्वातंत्र्य ही भाऊरावांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाची चतु:सुत्री होती. याचा त्यांनी आपल्य शैक्षणिक विचारात अतंर्भाव केला होता. भाऊरावांच्या मते अडाणी जनतेला जर चांगले दिवस यायचे असतील तर एकच रामबाण उपाय व तो म्हणजे शिक्षण होय. त्यांच्यामते शिक्षणाने बालकांचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक असते. त्याकरिता त्यांनी वसतिगृहाच्या स्तरावर आश्रमीय पध्दतीचा वापर केला होता. बालकांनी स्वतःच्या उपजीविकेसाठी व प्रगतीसाठी शाळा शिकत जनावरांची काळजी घेणे, शेती करणे, शेतीसाठी आणि पिण्यासाठी पाण्याची सोय करणे, स्वतः स्वयंपाक करणे आणि इतर आश्रगीय कामे करणे यावर भर दिला होता. या दैनंदिन कामामुळे विद्यार्थ्यांत आत्मनिर्भरता, उधोगप्रियता, समाजसेवा, दुसऱ्याच्या श्रमाचा फायदा न घेणे, या गुणांची मुलांमध्ये जोपासना होत असे. त्यामुळे 'कमवा व शिका' ही भावना मुलांमध्ये रूजून मोफत शिक्षणास चालना मिळत असे. भाऊरावांच्या मते, जातपात, पंथभेद यांना वाव न देता शिक्षणाद्वारे प्रगतीची संधी सर्वांना मिळाली पाहिजे. तरचं शिक्षणाने पिळवणुक रहित समाज निर्माण होईल, त्यांच्यागते, शिक्षणाने शास्त्रीय दृष्टीकोण निर्माण करावा. त्यासाठी त्यांनी स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद असे ध्येय ठरवून शासन दरबारी, शेतकऱ्याकडे आम्हांस ओसाड जमीन दया, आम्ही तिचे सुपीक जमीनीत कष्टाने परिवर्तन करू, असे जाहिरपणे सांगत असतं, अशा रितीने लोकांना शिक्षणाभिमुख करून त्यांच्यात शास्त्रीय दृष्टीकोन निर्माण व्हावा असे त्यांना वाटे.

शिक्षणाबरोबरच शिक्षकाविषयी कर्मवीर आण्णा म्हणतात कि, शिक्षणाचा मंडप ज्या आधारावर उभा करावयाचा तो शिक्षक, सदविचारी व परिश्रमावर निष्ठा ठेवणारा पाहिजे. शिक्षक हा अत्यंत साधी राहणी, पण अत्यंत पवित्र, अव्याभिचारी, थोर विचारसरणी असलेला पाहिजे. त्यांच्यामते, माझा आदर्श शिक्षक हा त्या खेडयाचा आदर्श ग्रामसेवक व आदर्श ग्रामनायक असला पाहिजे. भाऊरावांना खेड्यापाडयात काम करू इच्छिणारा शिक्षक केवळ डिग्रीचे ओझे सांभाळणारा नको होता. कर्तव्यनिष्ठा असलेला, मन आणि मनगट मजबुत असलेला व बहुजन समाजाला ज्ञान देण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेला शिक्षक त्यांना हवा होता. त्यांच्यामते. शाळा ही पोरं भरण्याची जागा नसून असंख्य मुलांना नवविचार देण्याची जागा आहे म्हणून तेथे शिक्षणाचे जलसिंचन करून ज्ञानवेलीच्या छायेत स्वावलंबनाचा पाठ शिकविणारा शिक्षक पाहिजे.

शिक्षकाप्रमाणे विद्यार्थ्यांविषयी कर्मवीर आण्णा म्हणतात की, प्रत्येक विद्यार्थी आचरणशील, विचारशील, बाणेदार वृत्तीचा, सत्याची चाड असलेला, अन्यायाची चीड असलेला, स्वाभिमानी, स्वावलंबी व विनयशील असला पाहिजे. त्यांच्यामते, केवळ पोपटपंची करणारे विद्यार्थी मला तयार करावयाचे नाहीत, त्यांच्याकरिता माझी संस्था नाही. अन्यायाला ठोकणारा एक जरी विद्यार्थी या संस्थेत राहिला तरी मी माझ्या जीवनाचे सार्थक झाले असे मानीन या संस्थेतून बाहेर पडणारे विद्यार्थी सुसंस्कृत, चारित्र्यवान व जबाबदार नागरिक बनले पाहिजे. आपला विद्यार्थी नोकरीसाठी लोकनेत्याचे उंबर झिजवणारा बेभान व बेकार तरूण नसावा. हा कर्मवीरांचा अट्टाहास होता. अशाप्रकारे त्यांचे शाळा, शिक्षक व विद्यार्थी यांच्याबाबत विचार होते. त्याच विचारांवर आज रयत शिक्षण संस्था वाटचाल करीत असून त्यांच्या संस्थेतील शिक्षक व विद्यार्थ्यांची त्यांच्या विचारावरच जडणघडण झाल्याचे दिसून येते.

अशाप्रकारे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपल्या विचाराप्रमाणे शैक्षणिक कार्य करून बहुजन समाजाला शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. थोर विभूती काळाची गरज म्हणून जन्माला येतात व अलौकिक कार्य करून जातात समाजातील अज्ञान व दारिद्रय समुळ नष्ट करण्यासाठी शिक्षणासारखे पवित्र आणि प्रबल साधन हाती घेऊन भाऊरावांनी उभा महाराष्ट्र जागा केला. त्यांनी शिक्षणाची गंगा महाराष्ट्राच्या खेडयापाडयातल गरीब शेतकऱ्यांच्या व पददलितांच्या झोपडीपर्यंत नेऊन पोहचविली व अज्ञान अंधःकारात खितपत पडलेल्या गोरगरीब समाजाचा उध्दार घडवून आणला, महाराष्ट्रातील बहुजन समाजाला उच्च वर्गाच्या सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्याची तळमळ त्यांना लागून राहिली होती. हि गोष्ट बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार घडवून आणण्याने साध्य होऊ शकेल, याची जाणीव त्यांना झाली होती. त्यामुळे त्यांनी स्वतःला शैक्षणिक कार्यात गुंतवून घेतले व बहुजन समाजाच्या उन्नतीचा मार्ग मोकळा करून दिला. अशाप्रकारे बहुजन समाजात शिक्षणाचे कार्य करीत असताना ९ मे १९५९ रोजी या महान शिक्षण प्रणेत्याची प्राणज्योत मावळली.

**निष्कर्ष:**

कर्मवीर भाऊराव पाटील हे महाराष्ट्रातील एक प्रभावी व्यक्तिमत्त्व होते. शिक्षण क्षेत्रात अनेकांना तोंड देत त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्याचबरोबर या संस्थेने अनेक अडचणीवर मात केली आहे. असे वाटते की कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयतेच्या विकासाला महत्त्व दिले आहे. वैयक्तिक आयुष्याकडे दुर्लक्ष करून शिक्षण संस्था भारताच्या स्वातंत्र्यानंतर उभा केल्या. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्याची तुलना करणे इतराशी शक्य नाही. कर्मवीर गरीबाच्या शिक्षणासाठी काम करणारे भाऊराव पाटील हे महाराष्ट्रातील एक होते आज लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केलेले शैक्षणिक कार्यामुळे आज अनेक मुल व मुली उच्च पदावर काम करत आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कष्ट खूप मोलाचे आहेत.

**संदर्भ:**

1. डॉ. ए. व्ही मॅथ्यू (१९८८) कर्मवीर भाऊराव पाटील, प्रकाशक सुभाष भोसले रयत शिक्षण संस्था, सातारा.
2. डॉ. एस एस भोसले 'महात्मा फुले ते भाऊराव पाटील' मराठी जर्नल नवभारत जून १९६४.
3. रयत शिक्षण संस्थेचे संशोधन लेख ७ (१) चे द्विवार्षिक जर्नल
4. धनंजय कीर (१९७६) " शाहू छत्रपती: रॉयल रिव्होल्युशनरी", लोकप्रिय प्रकाशन, मुंबई.

5. प्रा. साखळकर एकनाथ व डॉ. सुभाष भेंड महाराष्ट्राचे मानचिन्हे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई प्रथम आवृत्ती १ मे १९९६.
6. प्राचार्य भगत रा. तु. महात्मा ज्योतिराव ते कर्मवीर भाऊराव युनिव्हर्सल पब्लिकेशन कोल्हापूर प्रथम आवृत्ती १५ ऑगस्ट १९७३.